गुरुवार ४ डिसेंबर २०१४

तरुण भारत

# प्रशांत गवसच्या प्रकल्पाची स्पर्धेसाठी निवड

**दोडामार्ग:** मुंबई विद्यापीठाची जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा नुकतीच देवगड येथील स. ह. केळकर महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत नवनिर्माण शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रशांत गवस याने तिलारी पुनर्वसनग्रस्तांसमोरील समस्या, या विषयावर संशोधन प्रकल्प सादर केला. या प्रकल्पाची उत्कृष्ट संशोधन प्रकल्पासाठी विद्यापीठाने निवड करून त्याचा गौरव करण्यात आला. आता हा संशोधन प्रकल्प पनवेल येथे होणाऱ्या विद्यापीठस्तरीय अविष्कार स्पर्धेसाठी पात्र ठरविण्यात आला आहे. प्रा. डॉ. एस. यू. दरेकर यांनी सदर विद्यार्थ्याला बहुमोल मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष गोपाळ हळबे, संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेटये, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील व सर्व प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी यांनी प्रशांत गवस याचे अभिनंदन केले.